# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २३४) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.१८ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## रशियन तेल खरेदी थांबवा; अमेरिकेचा भारत, चीनला थेट इशारा

वॉशिंग्टन दि.१७ (वृत्तसंस्था)- रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी करणाऱ्या भारत आणि चीनला अमेरिकेने पुन्हा एकदा मोठा इशारा दिला आहे. अमेरिकन संसदेत रशियाविरोधातील नव्या निर्बंधांचे विधेयक मंजूर झाल्यानंतर सत्ताधारी डेमोक्रॅटिक पक्षाचे ज्येष्ठ खासदार रिचर्ड ब्लूमेंथल यांनी दोन्ही देशांना रशियन ऊर्जा खरेदी थांबवण्याचे सुनावले आहे. ''भारत आणि चीनने आता रशियाव्यतिरिक्त इतर देशांकडून तेल आणि नैसर्गिक वायू खरेदी करावा,'' अशा थेट शब्दांत त्यांनी सुनावले आहे. या संदर्भातील वृत्त 'हिंदूस्तान टाइम्स' या वृत्तसंस्थेने दिले आहे.

अमेरिकन संसदेत रशिया आणि इराणवर कडक निर्बंध लादणारे एक महत्त्वाचे विधेयक मंजूर झाल्यानंतर जागतिक पटलावर राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. या विधेयकाचे रूपांतर कायद्यात झाल्यानंतर रशियन ऊर्जा उत्पादने (तेल आणि गॅस) खरेदी करणाऱ्या प्रमुख देशांवर तब्बल १०० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क (टॅरिफ) लादण्याचे अधिकार अमेरिकेच्या अध्यक्षांना मिळणार आहेत. या पार्श्वभूमीवर डेमोक्रॅटिक पक्षाचे खासदार रिचर्ड ब्लूमेंथल यांनी भारत आणि चीनला थेट इशारा दिला आहे. ''चीन आणि भारताने आपली भूमिका त्वरित बदलावी. रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करणे थांबवून इतर पर्यायांचा शोध घ्यावा. रशियाचे लाड पुरवणे ही राजकीय रणनीती असू शकत नाही,'' अशा शब्दांत ब्लूमेंथल यांनी पत्रकारांशी बोलताना आपली भूमिका मांडली आहे.

# मनोज जरांगे यांचे उपोषण स्थगित

## मराठा आरक्षणासाठी सरकारला ३ महिन्यांची मुदत; आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार



बीड दि.१७ (प्रतिनिधी)- जालनामधील अंतरवाली सराटीहून मुंबईच्या दिशेने निघालेले मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी सरकारचे शिष्टमंडळ बीडमधील पाटोदा येथे दाखल झाले. यामध्ये मंत्री राधाकृष्ण विखे, मंत्री दादा भुसे, आमदार प्रसाद लाड, आमदार सुरेश धस, बीड जिल्हाधिकारी यांनी मनोज जरांगे यांच्यासोबत संवाद साधला. यानंतर आज सकाळी ६ वाजता पत्रकार परिषद घेऊन सरकारचे शिष्टमंडळ आणि मनोज जरांगे यांच्यात चर्चा झाली. यानंतर मनोज जरांगे यांनी सरकारला ९० दिवसांची मुदत दिली. ३ महिन्यात सातारा गॅझेट लागू करा. सरकारला ३ महिन्यांचा वेळ देतो. जर सरकारने धोका दिला, तर आम्ही मुंबई गाठणार, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. मी आज उपोषण स्थगित करतो, मात्र आंदोलन सुरुच राहणार, असं मनोज जरांगे यांनी स्पष्ट केलं. तसेच मुंबईत गेलेल्या १ लाख ०७ हजार समर्थकांनी माघारी यावं, असं आवाहन देखील मनोज जरांगेंनी केलं.

५८ लाख नोंदी कमी होणार नाही, याची खात्री द्या. नोंदी शोधण्यासाठी आम्ही माणसं देतो. शिंदे समिती काम करत नाही आणि सरकारही लक्ष देत नाही. हे आंदोलन यशस्वी झाल्याशिवाय थांबणार नाही. ही लढाई थांबणार नाही, मी उपोषण सोडणार नाही. आम्हाला आश्वासन दिलं, तरी आंदोलन सुरु राहणार, असं मनोज जरांगे म्हणाले. तसेच सातारा गॅझेट लागू करण्यासाठी तीन महिने देतो, असंही मनोज जरांगेंनी सांगितले. मराठा समाजाला खुन्नस देणं चांगलं नाही. राधाकृष्ण विखे चुकत असले तरी त्यांच्यावर प्रेम करा. एकनाथ शिंदेंवरही प्रेम करु पण आता नाही. मंत्र्यांनी टीका केली तर आम्ही गप्प बसणार नाही, असं मनोज जरांगे म्हणाले. मराठा समाजाला खुन्नस देणं चांगलं नाही. चर्चा न करणारे आज चर्चेसाठी आले की नाही?, आरक्षणापेक्षा समाजाची इज्जत महत्वाची आहे, असंही मनोज जरांगेंनी सांगितले.

सातारा गॅझेट बाबत ११०० पानांचा अहवाल आहे. याबाबत ३ ते ४ महिन्यात आम्ही कारवाई करू. अभ्यासासाठी यात वेळ हवा आहे. हैद्राबाद गॅझेटबाबत याचिका सध्या न्यायालयात प्रलंबित आहे. यामध्ये हैद्राबाद गॅझेटच्या जीआरला स्थगिती मिळणार नाही. याची काळजी घेतली जाईल, असं राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले. यावर मराठा समाजालाच का डावललं जातंय? सातारा, कोल्हापूर, पुणे, औंधचं गॅझेटियर लागू करा, असं मनोज जरांगेंनी सांगितले. जीआर काढून गॅझेटियरची अंमलबजावणी करावी लागेल. ५८ लाख नोंदी सापडल्या. त्यातली एकही कमी व्हायला नको. नोंदी कमी करणार नाही, याची लेखी हमी द्यावी, असं मनोज जरांगे म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे माझे वैरी नाहीत. पण समोरुन वार आलं, तर काय करणार?, चांगल्या अधिकाऱ्यांना कुणबी रेकॉर्ड शोधण्याचे काम द्या. तुम्हाला वेळ मारून न्यायचा असेल तर आमचं आंदोलन चालूच राहू द्या, असं मनोज जरांगेंनी सांगितले. मराठवाड्यातील ४ लोकप्रतिनिधींचे रद्द करण्यात आलेले ४ कुणबी प्रमाणपत्र वैध करून द्या, अशी मागणी देखील मनोज जरांगेंनी केली. ५ मुद्दे सांगितले. यावर देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट बोलावं. पत्रकार परिषद घेऊन बोला नाहीतर व्हिडीओ काढून बोला, असं मनोज जरांगे म्हणाले.

## २० दिवसानंतर उपोषण नाट्य संपलं, मराठा समाज नाही, तर मनोज जरांगे यांचा अहंकार जिंकला, अजय बारस्कर यांचा आरोप

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी आज (१७ सप्टेंबर) उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. सरकारच्या शिष्टमंडळाच्या भेटीनंतर मनोज जरांगेंनी ९० दिवसांसाठी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. तसेच उपोषण स्थगित केलं. मात्र आंदोलन सुरुच राहणार, असं मनोज जरांगेंनी स्पष्ट केलं. मनोज जरांगे यांनी सरकारला ९० दिवसांची मुदत दिली आहे. जीआर काढून गॅझेटियरची अंमलबजावणी करावी. ५८ लाख नोंदींमधील एकही नोंद कमी व्हायला नको...नोंदी कमी करणार नाही, याची लेखी हमी द्यावी, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली. जर सरकारने धोका दिला, तर आम्ही मुंबई गाठणार, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला.

मनोज जरांगे यांनी उपोषण स्थगित केल्यानंतर मराठा आरक्षण अभ्यासक अजय महाराज बारसकर यांनी हल्लाबोल केला आहे. २० दिवसानंतर उपोषण नाट्य संपलं. अंतरवाली सराटीच्या सरपंच यांचा मुलगा आणि कंत्राटदार यांनी मिळून राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत सेटिंग केली. आंदोलनाचं नेतृत्व बुद्धीहीन माणसाकडं पाहिजे. मनोज जरांगे हा कुटील, कपटी माणूस आहे. मराठा समाज नाही, तर मनोज जरांगे यांचा अहंकार जिंकला, अशी टीका अजय बारसकर यांनी केली. वाळू माफिया आणि चौकशी यांच्यावर सेटिंग झाली. आता चौकशी होणार नाही. मनोज जरांगे यांचा लढा सोबतच्या लोकांना राजकारणात आणण्यासाठी आहे. मनोज जारंगे ब्रह्मराक्षक बनून आपल्या डोक्यावर बसलाय. मनोज जरांगे भाजपचं पाळीव कुत्रं आहे, असा घणाघातही अजय बारसकर यांनी केला.

मनोज जरांगेला मोठं करण्यात भाजप सरकारचा मोठा हात आहे. मंत्री दादा भुसे यांचं अभिनंदन करतो. दादा भुसेंनी सांगितलं की, मुद्द्यावर बोला. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवारांनी सांगितलं आहे की, अंधारातून सरकार यांना वेगळं देत आहे. १४०० कोटी रुपयांचे टेंडरमुळे, बलांडे यांना दिले का? हे राधाकृष्ण विखे पाटलांनी सांगावं, असंही अजय बारसकर यांनी सांगितलं. मनोज जरांगेचं आंदोलन स्वतःच्या लेकरबाळासाठी आहे. मुख्य प्रश्नावरून लक्ष हटवण्यासाठी मनोज जरांगे यांचं आंदोलन आहे, असा आरोपही अजय बारसकरांनी केला.

मनोज जरांगे यांचा मुंबई दौरा रद्द होण्यामागे, बंद खोलीतील सेटलमेंट हे यामागचं कारण आहे. पांडुरंग तारक यांच्याकडे ड्राफ्ट देतो म्हणाले. पांडुरंग तारक यांचा अभ्यास काय आहे?, असा सवालही अजय बारसकर यांनी उपस्थित केला. आता ची चौकशी बंद करण्यासाठी लाभार्थी टोळीने सेटलमेंट केली. चोरी करणारा अत्यंत सावधगिरीने चोरी करतो. मनोज जरांगे लोकांना वेड्यात काढत आहे. मनोज जरांगे आणि त्याच्या साथीदारांना फायदा होतोय, असा दावाही अजय बारसकर यांनी केला.

## दुष्काळ जाहीर करावा ही गरज, तो आपोआपच होईल; कृषीमंत्री दत्तात्रय भरणेंची माहिती

पुणे दि.१७ (प्रतिनिधी)- महिलांना शेतकरी म्हणून ओळख देणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य आहे, देशात आजही सातबारा हा पुरुषांच्या नावे असतो. ज्या महिलांच्या नावावर शेतीचा सातबारा नाही, पण शेती किंवा शेती व्यवसायाशी संबंधित महिलांसाठी शेतकरी प्रमाणपत्र पोर्टल सुरू करण्यात आले असून त्या महिलांना शेतकरी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या प्रमाणपत्राच्या आधारे कृषी विभागाच्या विविध योजनांचा महिला शेतकऱ्यांना लाभ होईल, अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. तसेच, राज्यात गेल्या महिनाभरापासून पाऊस नसल्याने शेतकरी चिंतातूर झाला आहे, त्यामुळे दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीवर देखील भरणेंनी भूमिका मांडली.

राज्यामध्ये दुष्काळजन्य परिस्थिती असून दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावरही दत्तात्रय भरणेंनी उत्तर दिले. कृषी विभाग आणि महसूल विभागाकडून याबाबत माहिती घेतली जाईल. दुष्काळ जाहीर करावा, ही आजची गरज असून तो आपोपआच जाहीर होईल, हे सांगायची गरज नाही. राज्यातला शेतकरी अडचणीत आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी याचा आढावा घेतला आहे, अशी माहिती कृषीमंत्र्यांनी दिली. मी स्वत: पाच-सहा जिल्ह्यांचा दौरा करणार आहे, संपूर्ण माहिती घेणार आहे. राज्यातील शेतकऱ्यांना नक्कीच शासनातर्फे सहकार्य केले जाईल. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. चारा छावण्याबाबतही विचार केला जाईल, पशुधन आणि दुग्ध व्यवसायाचा निर्णय दिवाळीच्या आसपास घेतला जाईल, असेही भरणेंनी सांगितले.

राज्यात ५६ लाख शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा फायदा होणार आहे. साधारणत: ४० हजार ८८५ कोटी रुपये रक्कम यासाठी लागणार आहे. शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे अनुदानही देण्यात येईल. मात्र, टप्प्या-टप्प्याने प्रक्रिया सुरू होऊन ५० हजारांच्या कर्जमाफीसह लवकरात लवकरच शासनाकडून निर्णय होणार आहे, अशी माहितीही दत्तात्रय भरणेंनी दिली.

पावसाअभावी लातूर जिल्ह्यासह मराठवाड्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर कोरडा दुष्काळ ही राष्ट्रीय आपत्ती जाहिर करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, या प्रमुख मागणीसाठी शेतकरी संघटनेच्या वतीने आज लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यातील तिवटग्याळ पाटी येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले. जवळपास तासभर हे आंदोलन चालले. कोरडा दुष्काळ ही राष्ट्रीय आपत्ती जाहिर करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करावी, पीकविमा योजनेतून वगळलेल्या नुकसानीच्या बाबींचा पुन्हा समावेश करावा, पीक कापणी प्रयोग गावनिहाय घ्यावे, अश्या मागण्या यावेळी शेतकरी संघटनेने केल्या.

## धनुष्यबाण गोठवून दोन्ही गटांना स्वतंत्र चिन्हावर लढायला का सांगितले नाही? सुप्रीम कोर्टाचा सवाल

## शिवसेना पक्ष-चिन्हावर सर्वोच्च सुनावणी; शिंदे गटाचा जोरदार युक्तिवाद

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला बहाल करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात दाखल याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात जोरदार युक्तिवाद सुरू आहे. शिंदे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ नीरज किशन कौल यांनी न्यायालयासमोर सविस्तर आकडेवारी मांडत स्पष्ट केले की, विजयी आमदारांपैकी तब्बल ७६% मते ही एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी असलेल्या ४० आमदारांना मिळालेली आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगाने केवळ लोकप्रतिनिधींच्या संख्येवरच नव्हे, तर मिळालेल्या मतांच्या टक्क्यांवरून विधिमंडळ बहुमताचा घेतलेला निर्णय कायदेशीरदृष्ट्या पूर्णपणे योग्य आहे.

दरम्यान, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनी न्यायालयीन पुनर्विलोकनाची व्याप्ती स्पष्ट करताना, निवडणूक आयोगाने दोन्ही गटांना मूळ चिन्हाऐवजी स्वतंत्र चिन्हे देण्याचा तिसरा पर्याय का तपासला नाही, असा महत्त्वपूर्ण मुद्दा उपस्थित केला.

ॲड. नीरज किशन कौल यांनी २०१९ च्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीतील मतांचे गणित न्यायालयासमोर मांडले, २०१९च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे ५५ आमदार निवडून आले होते. या विजयी ५५ आमदारांना मिळालेल्या एकूण मतांपैकी तब्बल ७६% मते ही एकनाथ शिंदे यांच्या बाजूने असलेल्या ४० आमदारांच्या पारड्यात पडली होती; तर ठाकरे गटाच्या १५ आमदारांकडे केवळ २३.५% मते होती.

पराभूत उमेदवारांसह शिवसेनेला मिळालेल्या एकूण ९०,४८,७८९ मतांचा विचार केला, तरी शिंदे समर्थक ४० आमदारांकडे एकूण मतदानाच्या ४०% वाटा आहे, तर ठाकरे समर्थक आमदारांकडे हा वाटा अवघा १२% आहे. लोकसभेत शिवसेनेच्या निवडून आलेल्या १८ खासदारांपैकी शिंदे यांच्या पाठीशी उभ्या राहिलेल्या १३ खासदारांना एकूण मतांपैकी ७३% मते मिळाली होती, तर विरोधी गटाच्या खासदारांना केवळ २७% मते मिळाली होती. त्यामुळे निव्वळ डोकी मोजून नव्हे, तर जनमताचा कौल आणि मतांचे प्रचंड प्रमाण लक्षात घेऊनच निवडणूक आयोगाने निर्णय दिला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर ठाकरे गटाकडून उपस्थित केल्या जाणाऱ्या आक्षेपांना उत्तर देताना ॲड. कौल म्हणाले, विधानसभा अध्यक्षांनी यापूर्वीच अपात्रता याचिका फेटाळल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने केवळ नोटीस काढली असून कोणत्याही आदेशाला स्थगिती दिलेली नाही. शिवाय २०१९ ची ती विधानसभा विसर्जित होऊन २०२४ च्या निवडणुकांनंतर नवीन विधानसभा अस्तित्वात आली आहे, त्यामुळे जुनी अपात्रता आता निष्फळ ठरली आहे. ॲड. कौल यांनी न्यायालयाच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले, निवडणूक चिन्ह हे राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवर मान्यताप्राप्त पक्षाच्या मतांच्या टक्केवारीवर आधारित असते. न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशांमुळे ठाकरे गटाने २०२३ पासून नवीन नोंदणी न करता थेट त्या अंतरिम चिन्हावर (मशाल) अनेक निवडणुका लढवल्या. मात्र, लाखो मतदारांची ओळख पक्षाच्या चिन्हाशी जोडलेली असल्याने आणि शिंदे गटाकडे ७६% चे प्रचंड बहुमत असल्याने निवडणूक आयोगाचा निर्णय अवैध ठरवता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयात या अत्यंत महत्त्वाच्या खटल्यावरील दोन्ही बाजूंचा जोरदार युक्तिवाद आता पुढील आठवड्यात सुरू राहणार आहे.

## मराठ्यांना न्याय द्या, पण ओबीसींचे हक्क हिरावू नका; वडेट्टीवार आक्रमक

नागपूर दि.१७ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठी आंतरवाली सराटीत सुरू असलेले २० दिवसांचे उपोषण मनोज जरांगे पाटील यांनी अचानक स्थगित करून राज्य सरकारला ३ महिन्यांची मुदत दिली आहे. यावरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ''सरकारने मराठा समाजाला न्याय जरूर द्यावा, पण त्यांच्यासमोर झुकून ओबीसी समाजाचे वाटोळे का केले?'' असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी मराठा-ओबीसी आरक्षण, जरांगेंवरील भ्रष्टाचाराचे आरोप, मराठवाड्याचा दुष्काळ आणि नागपुरातील बिघडलेली कायदा-सुव्यवस्था यावरून सरकारला धारेवर धरले.

आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, ''मराठा समाजाला न्याय मिळाला पाहिजे, याला आमचा कधीच विरोध नव्हता. परंतु, एका समाजाला न्याय देताना दुसऱ्या समाजाच्या घटनात्मक हक्कांवर गदा येता कामा नये. या सरकारने ओबीसींचे अक्षरशः वाटोळे केले आहे. ओबीसींच्या ३७८ जातींपैकी २०० जातींमधील लोकांचे दरडोई उत्पन्न २ हजार रुपयेही नाही. कोणीतरी रस्त्यावर ताकद दाखवली म्हणून सरकार ओबीसींचे नुकसान करत असेल, तर जनता त्यांना कधीही माफ करणार नाही.''

मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर संशय व्यक्त करताना वडेट्टीवार यांनी अत्यंत गंभीर आरोप केले. ''जरांगे पाटील यांच्या जवळच्या एका व्यक्तीला जलसंपदा विभागाची हजारो कोटींची कामे मिळाली होती. ही कामे मुख्यमंत्र्यांनी थांबवली, म्हणूनच जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना शिव्या घातल्या का? त्याच रागातून ते मुंबईला निघाले होते का? आणि आता अचानक उपोषण स्थगित करण्यामागे सरकार आणि जरांगे पाटील यांच्यात नेमका कोणता समझोता झाला आहे?'' असे अनेक धारदार सवाल त्यांनी उपस्थित केले.

## हिंदी बाजूला ठेवता येणार नाही; सर्वोच्च न्यायालयाने जोसेफ विजय सरकारला फटकारले!

नवी दिल्ली दि.१७ (वृत्तसंस्था)- देशभरातील ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालयांच्या स्थापनेवरून सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडू सरकारला मोठा झटका दिला आहे. ''हिंदी भाषेला राज्याच्या भूमीपासून पूर्णपणे बाजूला ठेवता येणार नाही,'' असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकारची फेरविचार याचिका गुरुवारी फेटाळून लावली. तसेच, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात नवोदय विद्यालयांसाठी ३ महिन्यांत जागा शोधण्याचे निर्देश देत आपल्या भूमिकेत बदल करण्याचा सल्ला न्यायालयाने राज्य सरकारला दिला आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. मद्रास उच्च न्यायालयाने तामिळनाडूमध्ये नवोदय विद्यालये सुरू करण्याचे निर्देश दिले होते. या निर्णयाला तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सध्या तामिळनाडू हे देशातील एकमेव असे राज्य आहे, जिथे एकही जवाहर नवोदय विद्यालय नाही.

## ओमराजे निंबाळकरांवरचा 'तो' गुन्हा अखेर रद्द; औरंगाबाद खंडपीठाचा मोठा निर्णय

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना (ढोकी) येथील तोडणी मुकादम दिलीप शंकर ढवळे यांच्या आत्महत्या प्रकरणात दाखल गुन्ह्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने शिवसेना खासदार ओम राजेनिंबाळकर यांच्यासह इतर चार अर्जदारांवरील गुन्हा व दोषारोपपत्र रद्द केले आहे.

न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्या एकलपीठाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. या प्रकरणात ओमराजे निंबाळकर व इतर अर्जदारांच्या वतीने बाजू मांडताना ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. महेश देशमुख यांनी ॲड. एस. ए. वाकुरे यांच्यासाठी युक्तिवाद केला.

त्यांनी नमूद केले की, मृत ढवळे यांनी २०१२-१३ पासून सुरू असलेल्या वादात अर्जदारांविरुद्ध पूर्वी कधीही तक्रार केलेली नव्हती; उलट त्यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेत या अर्जदारांविरुद्ध काहीही तक्रार नसल्याचे नमूद होते. याशिवाय, ओमराजे हे साखर कारखान्याचे संचालक किंवा पदाधिकारी नव्हते, तसेच संबंधित ठरावांवर त्यांची स्वाक्षरीही नव्हती.

त्यामुळे त्यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ४०६, ४०९ आणि ४२० नुसार फसवणूक किंवा विश्वासघाताचा कोणताही गुन्हा सिद्ध होत नाही. तसेच, आत्महत्येचा थेट संबंध नसल्याने कलम ३०६ (आत्महत्येस प्रवृत्त करणे) लागूच होत नाही, असा युक्तिवाद करत त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचे दाखले दिले. सरकारी पक्षाच्या वतीने ॲड. एस. बी. नरवडे यांनी अर्जदारांचा कट कारस्थानात सहभाग असल्याचा दावा करत अर्जांना विरोध केला, तर मध्यस्थ तक्रारदारांतर्फे ॲड. व्ही. डी. साळुंके यांनी युक्तिवाद केला. बँक संचालकांच्या वतीने ॲड. ए. टी. जगताप तर इतर संचालकांतर्फे ॲड. एम. आर. देशमुख यांनी युक्तिवाद केला. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून घेत स्पष्ट केले की, २०१० चे कर्ज प्रकरण आणि २०१९ ची आत्महत्या यामध्ये कोणताही थेट संबंध आढळत नाही. त्यामुळे सर्वच अर्जदारांवरील कलम ३०६ चे आरोप रद्द करण्यात आले. तसेच, कारखान्याचे संचालक नसलेल्या ओमराजे निंबाळकर, बाळासाहेब माकोडे, चंद्रप्रकाश जमाले, द्वारकानाथ माळी व गुंडू पवार यांच्यावरील कलम ४०६, ४०९ व ४२० चे गुन्हेही न्यायालयाने पूर्णपणे रद्द ठरवले. मात्र, संबंधित ठरावावर स्वाक्षरी असणाऱ्या काही तत्कालीन संचालकांवरील फसवणुकीचे आरोप कायम ठेवत त्यांचा अर्ज न्यायालयाने फेटाळला

## आमचा संबंध नाही, चारित्र्य हनन कराल तर खपवून घेणार नाही; दिशा सालियान प्रकरणात उद्धव ठाकरे यांची प्रतिक्रिया

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- दिशा सालियान हिचा मृत्यू दुर्दैवी आहे, पण या प्रकरणाशी आमचा कुठलाही संबंध नाही, आम्ही तिला ओळखत देखील नाही. तरीही सीबीआयच्या एफआयआरमध्ये माझे, आदित्यचे नाव टाकले गेले. हा राजकीय षडयंत्राचाच भाग आहे. त्यांना काय करायची ती चौकशी करू द्या? असे आव्हान उद्धव ठाकरेंनी दिले.

पण जे चारित्र्य हनन गेल्या दोन वर्षापासून सुरू आहे, ते आता थांबले पाहिजे, अन्यथा मला कायदेशीर पाऊल उचलावे लागेल, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला. उद्या, या प्रकरणात तुमच्यापैकी कोणाचेही नाव येऊ शकते? असे पत्रकारांना म्हणत उद्धव ठाकरे यांनी दिशा सालियान प्रकरणावर आपण आतापर्यंत काहीच बोललो नाही. पण यापुढे चारित्र्य हनन खपवून घेणार नाही, असे ठणकावून सांगीतले.

छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनी दिशा सालियान, सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्ष आणि चिन्ह कोणाचे? यावर सुरू असलेल्या सुनावणीवरही भाष्य केले. दिशा सालियान प्रकरणात सीबीआयच्या एफआयआरमध्ये माझे आणि आदित्य ठाकरेचे नाव असल्याच्या चर्चा आहेत. यावर उपरोधिकपणे उद्धव ठाकरे यांनी दोन वर्षापासून या प्रकरणाशी आमचा कुठलाही संबंध नसताना आरोप केले जात आहेत, असे सांगीतले.

पण आम्ही आतापर्यंत यावर कधीही बोललो नाही, आताही मला जास्त बोलायचे नाही. झालेली घटना दुर्दैवी आहे, झाले ते वाईटच आहे. आदित्य ठाकरे काय किंवा आम्ही कोणीही दिशा सालियानला ओळखत नाही, आमची तिच्याशी कधी भेटही झाली नाही. तरी देखील एफआयआरमध्ये आमची नावे घेतली गेली. निश्चितच हा एका राजकीय षडयंत्राचा भाग आहे, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला.

सुप्रीम कोर्टात शिवसेनेच्या पक्ष आणि चिन्हावर सुरू असलेल्या सुनावणीतील काही निरीक्षणा संदर्भात पत्रकारांनी उद्धव ठाकरे यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले, एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत गेलेल्या गद्दाराची चोरी आता उघडी झाली आहे. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव, पक्ष आणि चिन्ह या लोकांनी चोरले. चोरीचा माल आपला दाखवून श्रीमंती दाखवण्याचा हा त्यांचा प्रयत्न होता. तुमचा निर्णय योग्य होता, तर मग तुम्ही स्वतंत्र चिन्ह घेऊन निवडणुका का लढला नाहीत? चोरीचा माल आपलाच म्हणण्याचा गद्दारांचा डाव त्यांच्यावरच उलटला असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले.

## काही वेळा ग्रहण लागते, तेही सुटेल; व्ही. राधा यांचे वक्तव्य

अमरावती दि.१७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये (एमपीएससी) पेपरफुटीची घटना ही खूपच वाईट गोष्ट घडलेली आहे. एमपीएससीमध्ये परीक्षा घेण्याची क्षमता नाही, असे नाही. आम्हाला एमपीएससीची यंत्रणा अधिक मजबूत करावी लागेल. काही वेळा ग्रहण लागते, तेही सुटेल आणि एमपीएससी अधिक चांगल्या क्षमतेने परीक्षा घेण्यासाठी सज्ज होईल, असे मत सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांनी येथे व्यक्त केले.

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. या समितीची बैठक गुरूवारी अमरावतीत झाली. बैठकीदरम्यान व्ही राधा यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, एमपीएससी परीक्षांमध्ये गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाईसाठी कायदा आहेच, पण हा कायदा अधिक कडक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भविष्यात चुकीची कामे करणाऱ्यांना भीती वाटायला हवी, अशा कठोर उपाययोजना केल्या जातील. सीसीटीव्ही कॅमेरांच्या माध्यमातून पूर्णवेळ देखरेख, पारदर्शकता, अंतर्गत मूल्यमापन, या सुधारणा करणे गरजेचे आहे.

स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून समितीला अनेक महत्वपूर्ण सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यांनी मांडलेल्या मुद्यांमधून आम्हाला बरेच काही शिकायला मिळाले आहे. सरळ सेवा भरतीविषयी उमेदवारांचे काही प्रश्न आहेत. शिक्षकांच्या परीक्षेविषयी अनेकांनी प्रश्न उपस्थित केले. पोलीस विभागातील अंतर्गत परीक्षा पद्धतीविषयी सूचना करण्यात आल्या आहेत. कृषी विभागाशी संबंधित पदभरतीच्या परीक्षेबद्दल मुद्दे उपस्थित करण्यात आले. सर्व विभागांच्या प्रमुखांसोबत चर्चा करून याविषयी परीक्षेपासून ते नेमणुकीपर्यंत कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी उपाययोजना सुचवण्यात येतील, असे व्ही. राधा यांनी स्पष्ट केले.

# गौरी पूजन

बहरलेल्या वसुंधरेच्या वातावरणात सर्वांची मनं प्रसन्न केल्यानंतर सुखद आठवणी मागं ठेवून 'आठवणीतील श्रावणमास' आपला पाय काढता घेतो. अतिशय जल्लोषात गणरायाचं आगमन होतं न् मग चाहूल लागते ती गौरीच्या आगमनाची. गणपतीच्या पाठोपाठच गौरीचं आगमन होत असल्यानं 'गौरी-गणपती' असा सामाजिक शब्दही रुढ झालेला असावा.

भादप्रद शुद्ध आष्टमीला ज्येष्ठा गौरीचं आगमन होतं. 'गौरीचं आगमन अनुराधा नक्षत्रावर होतं.' 'गौरीचं पूजन हे ज्येष्ठा नक्षत्रावर होतं,' तर 'विसर्जन हे मूळ नक्षत्रावर होतं.' गौरीचं पूजन हे ज्येष्ठा नक्षत्रावर होत असल्यामुळेच तिला 'ज्येष्ठा गौरी' असंही संबोधलं जातं. दक्षिणेत हा सण 'महालक्ष्मीचा' उत्सव म्हणून तीन दिवस, गौरी पूजनाचा दिवस, गौरी विसर्जनाचा दिवस. त्याच वेळी गौरीबरोबर गणेशाची प्रतिमा तयार करुनच बसवितात. काही जणांकडे गणेशाप्रमाणेच गौरीचे मुखवटे आणून स्टँडच्या आधाराने सुरेखा नेसवून गौरीच्या सुंदर प्रतिमा उभ्या करतात, तर काही जणांकडे मातीऐवजी पितळेचे मुखवटे असतात.

श्रावणमासात जिवतीच्या कागदाच्या चित्राच्या फोटोचे पूजन करतात; तसेच पूजन गौरीचेही काही जण करतात. काही जणांकडे कुमारिकेकडून सुवासिक फुलांच्या झाडांचे गौरी म्हणूनही पूजन करतात. कोकण परिसरात मात्र तेरड्याचे रोप सुपात लावून त्यावर गौरीचा मुखवटा लावण्याचा प्रधान आहे, तर काही मंडळींच्या घरांत नदीकिनाऱ्यावरील पाच खडे आणून त्याचे 'गौरीच्या रुपानं आलेली लक्ष्मी समजून पूजन केलं जातं. गौरी पूजनाविषयी काही कथा या आपल्या पुराणात लिहून ठेवलेल्या आहेत. शिव म्हणजे शंकर. शंकराच्या परिवारातील गौरी ही एक देवता. गौरीचं मूळ ठिकाण 'कनोज' हे आहे. शंकरानं (गौरीला) पार्वतीला 'काली' अशा नावानं बोलाविलं. त्याचा पार्वतीला खूप राग आला. त्यानंतर पार्वतीनं अपार तपश्चर्येनं गौरी - गोरा रंग प्राप्त केला त्यामुळेच तिचे नाव 'गौरी' असं रुढ झालं, असा उल्लेख आपल्या पुराणात आहे. असुरापासून असुरक्षितता वाढू लागल्यावर सर्व देवांच्या पत्नी 'महालक्ष्मी'कडे गेल्या. महालक्ष्मीनं असुरांचा नायनाट करुन देवांच्या पत्नीचं रक्षण केलं. त्या दिवसापासून महालक्ष्मी पूजनाची ही परंपरा सुरु झाली असावी. गौरीबरोबरच महालक्ष्मीची पूजा करावी, असा उल्लेख आपल्या पुराणातील कथांमध्ये आढळतो. त्यामुळेच गौरी व महालक्ष्मी अशा दोन प्रतिमा तयार करण्याची परंपरा सुरु झाली, ती आजही कायम आहे. महाराष्टात बहुजन समाजात वेगळ्याच पद्धतीनं हा उत्सव साजरा केला जातो. मातीच्या पाच मडक्यांमधून हळदीनं दोरा रंगवून, खोबऱ्याच्या वाट्या, खारका त्यात घालून त्याची छान उतरंड तयार करतात. त्यानंतर त्यावरच गौरीचा मुखवटा बसवला जातो. अशा दोन प्रतिमा तयार केल्यानंतर त्यांचं मनोभावे यथासांग पूजन केलं जातं. तिसऱ्या दिवशी या गौरीचं विसर्जन केलं जातं. त्यानंतर त्या मडक्यांतील खोबरं, खारका यांच्या गाठी करुन दोऱ्यानं बांधून ते दोरे घरातील महिलांच्या, मुलांच्या गळ्यात बांधले जातात. एखादा चांगला दिवस पाहून ते दोरे दुधात, दह्यात भिजवून शेतात चांगल्या ठिकाणी पुरण्याचीही परंपरा बहुजन समाजात आजही मनोभावे पाळली जाते, तर बऱ्याच ठिकाणी गौरीचे पूजन आगमन पूजन, नैवेद्य, तिसऱ्या दिवशी विसर्जन होतं. जवळ असणाऱ्या नदीतील विसर्जनानंतर किनाऱ्यावरील वाळूचे खडे घरात सर्वत्र टाकण्याचा प्रघात आहे. त्यामागील त्यांची संकल्पना हीच, की त्यामुळे घरात शांतता, सुबत्ता, समृद्धी, भरभराट होऊन सद्भावना वाढीस लागते. गौरीच्या या तीन दिवसांच्या उत्सवाच्या माध्यमातून घराघरांतून आज हळदी - कुंकवाच्या कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. ही परंपरा फार पूर्वापार चालत आलेली आहे. त्या काळात समाजात स्त्रियांच्या वावर अतिशय कमी होता. अशा हळदी-कुंकवाच्या समारंभाच्या माध्यमानं का होईना स्त्रियांना, मुलींना एकत्रित येऊन त्यांच्या विचारांचं संवर्धन व्हावं, असा या कार्यक्रमामागचा भाव आहे. गौरीची आरासा, सजावट, रांगोळी या माध्यमातून तिच्या अंगातील कलाकुणास वाव मिळावा, त्याचबरोबर घरांघरांतून काम करणाऱ्या स्त्रिया, मुलींना एकत्रित येऊन आपली मनंही मोकळी करता यावीत, समाजातील अनेक स्त्रियांमध्ये एकोपा, सख्य, सामजंस्य वाढीला लागावे, हीच उदात्त संकल्पना यामागं होती. अशाच उदात्त संकल्पनेतून आपल्या प्रत्येक सण-उत्सवाची परंपरा ही पूर्वीपासूनच आखलेली आहे. यामधूनच प्रत्येकाचं जीवन समृद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे, हे बाकी खरं !

# जैन धर्माचा सर्वात मोठा पर्व दशलक्षण - रचना पहाडे

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – जैन धर्मानुसार, प्रत्येक जीवामध्ये हे गुण सुप्त अवस्थेत असतात. संसारातील कर्मबंधनांमुळे हे गुण झाकले जातात. या १० दिवसांत विशेष पूजा, व्रत, आणि उपवास करून स्वतःच्या आत्म्याला ओळखण्याचा आणि हे १० गुण जागृत करण्याचा प्रयत्न केला जातो. हे पर्व मानवाला क्रोधाकडून क्षमेकडे आणि मोहाकडून त्यागाकडे नेणारा मार्ग दाखवते.या १० दिवसांत दररोज आत्म्याच्या एका विशिष्ट गुणाची पूजा आणि चिंतन केले जाते.

१. उत्तम क्षमा (पहिला दिवस): मनातील राग, द्वेष आणि अभिमान सोडून सर्वांना माफ करणे आणि स्वतःही क्षमा मागणे.२. उत्तम मार्दव (दुसरा दिवस): मनामध्ये नम्रता बाळगणे आणि अहंकाराचा (घमेंड) पूर्णपणे त्याग करणे.३. उत्तम आर्जव (तिसरा दिवस): कपट न करता मन, वचनाने अत्यंत सरळ आणि प्रामाणिक राहणे.४. उत्तम शौच (चौथा दिवस): मनातील लोभ आणि लालसा दूर करून पवित्र व समाधानी राहणे.५. उत्तम सत्य (पाचवा दिवस): नेहमी हितकारक, गोड आणि सत्य बोलणे.६. उत्तम संयम (सहावा दिवस): आपल्या इंद्रियांवर आणि मनावर ताबा ठेवणे, तसेच प्राण्यांची हिंसा न करणे.७. उत्तम तप (सातवा दिवस): आत्मशुद्धीसाठी उपवास, ध्यान आणि इच्छांवर नियंत्रण ठेवणे.८. उत्तम त्याग (आठवा दिवस): आपल्याकडील वस्तू, धन किंवा वाईट विचारांचे दान करणे.९. उत्तम आकिंचन्य (नववा दिवस): संसारातील कोणत्याही भौतिक वस्तूवर (घर, पैसा, कपडे) ममत्व किंवा आसक्ती न ठेवणे.१०. उत्तम ब्रह्मचर्य (दहावा दिवस): पवित्रतेचे पालन करणे आणि आपले मन पूर्णपणे आत्म्यामध्ये लीन करणे. अशी माहिती रचना पहाडे जैन हिने दिली.

# सेवा संकल्पातून लोकाभिमुख प्रशासन
# महिनाभराचा उपक्रम ; प्रशासन जनतेच्या दारी

**'सेवा परमो धर्मः'** ही केवळ एक उक्ती नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना आहे. शासनाच्या योजना तयार होतात, निर्णय घेतले जातात; मात्र त्यांचा खरा अर्थ तेव्हा अधोरेखित होतो, जेव्हा त्या योजनांचा लाभ गावातील सामान्य कुटुंबापर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत, महिलांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचतो. प्रशासन १७ सप्टेंबरपासून अशाच एका लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सज्ज झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.




प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, त्यांच्या कार्यकाळात 'सेवा परमो धर्मः' या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.हे अभियान म्हणजे केवळ कार्यक्रमांची मालिका नाही. सरकारी सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ नेण्याचा हा प्रयत्न आहे. कार्यालयाच्या फेऱ्या कमी होणार गावातील एखाद्या नागरिकाला प्रमाणपत्र हवे असते, शेतकऱ्याला जमिनीची नोंद अद्ययावत करायची असते किंवा एखाद्या कुटुंबाला सरकारी योजनेचा लाभ घ्यायचा असतो. अशा वेळी अनेकदा विविध कार्यालयांमध्ये जावे लागते. सेवा संकल्प अभियानात ही प्रक्रिया शक्य तितकी सोपी करण्यावर भर देण्यात आला आहे.

प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू' शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. म्हणजेच अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.

**शिबिरांच्या माध्यमातून कामांना गती**

या शिबिरांमध्ये फेरफार नोंदींचा निपटारा, स्वामित्व सनद, शेतपाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, वनहक्क दावे, नळजोडणी, वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ आणि ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सोप्या भाषेत सांगायचे तरङ्ख्या सेवेसाठी नागरिकाला वारंवार कार्यालयात जावे लागते, ती सेवा शक्य तितकी त्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न या अभियानातून होणार आहे.

**गावात सेवा, गावातच समाधान**

सेवा संकल्प अभियानाचा विशेष भर ग्रामीण भागावरही आहे. प्रत्येक गावात आणि वॉर्डात स्थानिक गरजेनुसार 'सेवा माझे योगदान' उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना यात सहभागी करून घेतले जाणार आहे. गाव स्वच्छ ठेवणे, नदीघाट आणि बारवांची स्वच्छता करणे, वृक्षारोपण करणे, रक्तदान करणे, आरोग्य तपासणी शिबिर घेणे, प्लास्टिकमुक्तीची जनजागृती करणे, जलसंधारण करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, रस्ते सुरक्षेबाबत जागृती करणे अशा अनेक उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळणार आहे.

**शासनाची सेवा, समाजाचा सहभाग**

याचा अर्थ एकच शासनाची सेवा आणि समाजाचा सहभाग एकत्र आला, तर गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो.ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जमीन आणि महसूल विषयक कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. फेरफार नोंदी, ७/१२, ८-अ, स्वामित्व सनद, वनहक्क दावे यांसारख्या बाबी अनेकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या आहेत. वनहक्क दाव्यांच्या बाबतीत नवीन दावे स्वीकारणे, जुन्या दाव्यांमधील दुरुस्ती करणे आणि पात्र दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अभियानाच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.म्हणूनच सेवा संकल्प अभियानाचा लाभ गावातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन गरजांशी जोडून पाहणे महत्त्वाचे आहे.

**अंगणवाडीतही सेवा उत्सव**

लहान मुले आणि त्यांच्या मातांसाठीही या अभियानांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'अंगणवाडी उत्सव' अंतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य आणि पोषणविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, फळे व मिठाईचे वाटप आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची तरतूद आहे. ग्रामीण कुटुंबाच्या आरोग्याचा पाया मजबूत करण्यासाठी आई आणि बालकाचे आरोग्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे अंगणवाडी उत्सव हा केवळ एक कार्यक्रम न राहता आई, बालक आणि पोषण यांना जोडणारा उपक्रम ठरतो.

**गावातील तरुणांच्या कल्पनांना नवे व्यासपीठ**

आज ग्रामीण भागातील तरुणांकडे अनेक चांगल्या कल्पना आहेत. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत ते नवे प्रयोग करू शकतात. योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर या कल्पना मोठ्या बदलाचे कारण ठरू शकतात.सेवा संकल्प अभियानात राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागात नवे प्रभावी उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यासाठी 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खासगी कंपन्यांचाही सहभाग घेतला जाणार आहे. निवडलेल्या उत्कृष्ट कल्पनांना तज्ज्ञांसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा**

देशाचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या अभियानाशी जोडण्यात आले आहे. 'विकसित भारत' आणि 'मुलांच्या स्वप्नातील भारत' या विषयांवर चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना व्यासपीठ देण्याचा हा प्रयत्न आहे.आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. त्यामुळे विकसित भारताची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यासोबतच त्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना भविष्यातील भारताच्या उभारणीशी जोडण्याचा हा प्रयत्न आहे.

**लाभार्थ्यांच्या घरापर्यंत 'आशीर्वादाचा दिवा'**

शासकीय योजनेचा लाभ मिळालेल्या नागरिकाच्या घरापर्यंत जाऊन 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्याचा उपक्रमही या अभियानात आहे. विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन दीप प्रज्वलित करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.सरकारची योजना कागदावर असते; पण तिचा लाभ जेव्हा एखाद्या कुटुंबाच्या घरात पोहोचतो, तेव्हा त्या योजनेला खरा अर्थ प्राप्त होतो. त्या समाधानाच्या क्षणाला जोडणारा हा उपक्रम आहे.

**बदलाची गोष्ट आता गावागावातून**

एखाद्या शेतकऱ्याला योजनेचा लाभ मिळाल्याने शेतीत बदल झाला, एखाद्या महिलेला बचत गटामुळे आर्थिक आधार मिळाला, एखाद्या विद्यार्थ्याला संधी मिळाली किंवा एखाद्या कुटुंबाचे जीवनमान सुधारले, तर ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट राहत नाही. ती इतरांसाठीही प्रेरणा बनते. म्हणूनच 'बदलाची गोष्ट' या उपक्रमातून विविध योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल त्यांच्या स्वतःच्या शब्दांत समाजासमोर आणला जाणार आहे. त्यांच्या अनुभवांचे व्हिडिओ आणि रील्सच्या माध्यमातून संकलन करण्यात येणार आहे.

**सेवा संकल्पाची खरी दिशा**

सेवा संकल्प अभियानातील प्रत्येक उपक्रमामागे वेगवेगळी उद्दिष्टे असली, तरी त्यामागची भावना एकच आहे. सामान्य नागरिकाला सेवा मिळिवण्यासाठी अधिक सोपे, सुलभ आणि जवळचे वातावरण निर्माण करणे.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद व लोकसहभाग वाढविणारा ठरणार आहे. योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना मिळावा, शासन अधिक लोकाभिमुख व्हावे आणि शासनाच्या योजना सामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. 'माहितीअभावी पात्र व्यक्ती वंचित राहता कामा नये', ही या उपक्रमामागील प्रमुख भूमिका आहे. या अभियानाला नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद त्याच्या यशासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

**(प्रवीण टाके)**
उपसंचालक
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

# 'यूपीआय'वरील शुल्क : विशेष माहिती

● यूपीआय वरील शुल्क कोणासाठी लागू आहे?

**उत्तर :** हे शुल्क फक्त व्यापाऱ्यांना लागू आहे.

● ग्राहकांना यूपीआय वापरताना शुल्क द्यावे लागेल का?

**उत्तर :** नाही. ग्राहकांसाठी यूपीआय वापरणे पूर्णपणे मोफत आहे.

● प्रश्न : लहान व्यवहारांवर शुल्क लागेल का?

**उत्तर :** २००० रुपयांपर्यंतच्या व्यवहारांवर कोणतेही शुल्क लागणार नाही.

● प्रश्न : २००० रुपयांपेक्षा जास्त यूपीआय व्यवहारांवर किती शुल्क आहे? उत्तर : २००० रुपयांपेक्षा जास्त व्यवहारांवर व्यापाऱ्याला ०.४ टक्के शुल्क आहे.

● प्रश्न : यूपीआय वरील शुल्काची
कमाल मर्यादा किती आहे?

**उत्तर :** एका यूपीआय व्यवहारासाठी जास्तीत जास्त शुल्क ३०० रुपये.

● प्रश्न : दोन व्यक्तींमधील व्यवहारांवर शुल्क लागेल का?

**उत्तर :** नाही. मित्रांना किंवा नातेवाईकांना पैसे पाठवणे पूर्णपणे मोफत आहे.

● प्रश्न : हे 'यूपीआय' शुल्कासंबंधी नवीन नियम कधीपासून लागू होतील?

**उत्तर :** हे नियम १५ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होतील.

● प्रश्न : 'यूपीआय' शुल्कामधून लहान व्यापाऱ्यांना सूट आहे का?

**उत्तर :** होय. ज्या व्यापाऱ्यांना महिन्यात १ लाख रुपयांपर्यंत मिळतात त्यांना सूट आहे.

● प्रश्न : P2PM व्यापारी म्हणजे कोण?

**उत्तर :** महिना १ लाख रुपयांपर्यंत 'यूपीआय' व्यावसायिक उत्पन्न असलेले छोटे व्यापारी म्हणजे P2PM व्यापारी.

● प्रश्न : लहान व्यापाऱ्यांनी २००० रुपयांपेक्षा मोठा व्यवहार स्वीकारल्यास 'यूपीआय' शुल्क लागेल का?

**उत्तर :** नाही. लहान व्यापाऱ्यांना २००० रुपयांवरील व्यवहारावरही शून्य 'यूपीआय' शुल्क असेल.

● प्रश्न : व्यापारी ग्राहकांकडून हे यूपीआय शुल्क वसूल करू शकतात का?

**उत्तर :** नाही. व्यापारी हे शुल्क ग्राहकांवर टाकू शकत नाहीत.

● प्रश्न : यूपीआय ॲप्स अतिरिक्त फी आकारू शकतात का?

**उत्तर :** नाही. UPI ॲप्स ग्राहकांकडून कोणतीही प्लॅटफॉर्म फी घेऊ शकत नाहीत.

● प्रश्न : रेल्वे तिकीट खरेदीवर किती शुल्क आहे?

**उत्तर :** रेल्वे तिकीट खरेदीवर प्रति व्यवहार ५ रुपये निश्चित शुल्क आहे.

● प्रश्न : टेलिकॉम आणि मोबाईल रिचार्जवर किती णझख शुल्क आहे?

**उत्तर :** यावर २००० रुपयांवरील व्यवहारासाठी ५ रुपये निश्चित शुल्क आहे.

● प्रश्न: विमा हप्ता भरण्यावर किती यूपीआय शुल्क आहे?

**उत्तर :** विमा हप्त्यासाठी २००० रुपयांवरील व्यवहारावर ५ रुपये निश्चित शुल्क आहे.

● प्रश्न : पेट्रोल पंप आणि इंधनावर किती 'यूपीआय' शुल्क आहे? **उत्तर :**इंधनासाठी २००० रुपयांवरील व्यवहारावर ५ रुपये निश्चित शुल्क आहे.

● प्रश्न : शेती साहित्याच्या खरेदीवर किती शुल्क आहे?

**उत्तर :** शेती साहित्यासाठी २००० रुपयांवरील व्यवहारावर ५ रुपये निश्चित शुल्क आहे.

● प्रश्न : म्युच्युअल फंड आणि शेअर बाजारातील व्यवहारांवर किती UPI शुल्क आहे?

**उत्तर :** भांडवली बाजारातील व्यवहारांवर ०.०२ टक्के शुल्क लागू होईल.

● : शेअर बाजारातील व्यवहारांसाठी कमाल शुल्क किती आहे?

**उत्तर :** या व्यवहारांसाठी कमाल शुल्क ३०० रुपये निश्चित केले आहे. अर्थात ०.०२% किंवा ३०० रुपये, जी रक्कम कमी असेल ती.

● : एसआयपी गुंतवणुकीवर यूपीआय MDR शुल्क लागू होईल का?

**उत्तर :**नाही. SIP द्वारे केलेल्या गुंतवणुकीवर हा UPI शुल्क लागू होणार नाही!!

● प्रश्न : ऑटोपे किंवा वारंवार होणाऱ्या देयांवर (ECS) हा 'यूपीआय' शुल्क लागेल का?
**उत्तर :** नाही. ऑटोपे आणि वीज बिलांसारख्या ऑटोमॅटिक देयांवर शुल्क लागणार नाही.

● प्रश्न : व्यापारी त्यांचा टठ कोड बदलण्याची गरज आहे का?

**उत्तर :** नाही. सध्याचे टठ कोड आणि साऊंडबॉक्स तसेच सुरू राहतील.

● प्रश्न : या 'यूपीआय' शुल्काची वसूली का केली जात आहे?

**उत्तर :** देशातील जवळपास प्रत्येक माणूस यूपीआय वापरत आहे. यूपीआय यंत्रणा अधिक सुरक्षित आणि मजबूत करण्यासाठी हे शुल्क घेतले जात आहे.

● प्रश्न : या पैशांचा वापर कशासाठी केला जाईल?

उत्तर : 'यूपीआय' संबंधित सायबर सुरक्षा आणि नवीन तंत्रज्ञानाच्या विकासासाठी.

**– संकलन**
**डॉ. अभय मंडलिक**

# आनंदलहरी भाग-१६०

**ऐसा संतांचा महिमा । जाली बोलायाची सीमा ।।**

मोह, माया, द्वेष, अहंकार या शत्रुंचा नायनाट करुन चोहीकडे समत्व पाहणारा, प्रसंगानुरुप जगाचे आघात सोसणारा संत असतो, असे तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. वृक्ष दगडाचा मार खातो आणि मारणाऱ्याला सावली, फळही देतो. त्याप्रमाणे लोकांच्या शिव्या, मार, नको ते बोलं सहन करुन त्याच लोकांच्या सुख-समाधानाची कामना करण्याचे कार्य संतांकडून सहज घडून जाते. बदल्याऐवजी बदलाची, परिवर्तनाची भाषा वापरणारा महात्मा समाजात आवश्यक तो बदल घडवून आणू शकतो. सदबुध्दी, सात्विक आचार-विचार असणारा, प्रेमाची दृष्टी चोहिकडे पसरविणारा संत भेटायला भाग्य लागते. स्वार्थाने गंजलेले हे देहरुपी लोखंड समतारुपी सोन्यात परीवर्तीत करावयाचे असेल तर संतरुपी परिसाचा संग लाभला पाहिजे. सत्वशील संतांचा सहवास जाणुनबुजून किंवा अचानकपणे किंवा नको असतांनाही लाभला तरी आपले जीवन सुखमय झाल्याशिवाय राहात नाही. आपण कोणत्याही भावनेने संतांच्या सहवासात गेलो तरी आपल्यात परिवर्तन करणे,



आपणाला सत्याची जाणीव करुन देणे एवढेच संतांना समजते. आपल्या सुखात सुख मानण्याची मानसिकता संत जोपासतात. आपल्या जीवनातील मलिन झालेले विचार, स्वार्थाने बरबटलेली भावना, इंद्रियाधिन झालेले मन हे सर्व व्यवस्थित करण्याची ताकद संतात असल्याने संतांचा सहवास लाभला पाहिजे. आत्मज्ञानी महात्मे भेटले म्हणजे आपले जीवन सार्थकी लागते, मोक्ष सायुज्याचा लाभ होतो. संतांचा महिमा अगाध आहे. अधिकाराच्या वर्णनाची परमावधी असणाऱ्या संतांबद्दल बोलताना तुकाराम महाराज म्हणतात,

अलिंगन घडे । मोक्ष सायुज्यता जोडे । ऐसा संतांचा महिमा ।
जाली बोलायाची सीमा । तीर्थे पर्वकाळ ।
अवघीं पायापें सकळ । तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ।

संत महात्मे ही चालते-बोलते तीर्थक्षेत्र असतात. सर्व पर्वकाळ, तीर्थे ही अशा संतांजवळ नांदत असतात. शुध्द मनाने अशा संत महात्म्यांची सेवा करणे म्हणजे भगवंतांची सेवा होय. या संत महात्म्यांजवळ लहान-मोठा, गरीब-श्रीमंत असा कसलाही भेद नसतो. त्यांना सेवेची, धन-धान्याची, प्रसिध्दीची, मोठेपणाची गरजही नसते. निसर्गत: देहाकडून जी अत्यंत आवश्यक कार्य व्हावीच लागतात, त्या कार्याव्यतिरिक्त यांना वेगळया कार्याशी देणे-घेणे नसते. ही अत्यावश्यक कार्ये करण्यातही त्यांना रस नसतो. केवळ समाजसेवा एवढाच विचार यांच्या डोक्यात असतो. माया-मोहाच्या जाळयात अडकलेल्या जिवाला बाहेर काढण्यासाठी यांची तळमळ असते. मानवतेचा आधारस्तंभ असणाऱ्या अशा संत-महात्म्यांना व्यावहारिक, ढोंगी लोकांनी मागे टाकले आहे. स्वत:च्या उदो-उदो करुन घेण्यासाठी निघालेल्या लोकांना काही लोक डोक्यावर घेत आहेत, हे विशेष. ढोंगी लोक कितीही थाट-माट करुन किंवा दिखावा करुन प्रसिध्दीच्या झोतात पुढे येत असले तरीही हिरा तो हिराच आणि काच तो काचच. असो, संतांची भेट व्हायला, त्यांची सेवा घडायला भाग्य लागते. ज्ञानोबा-तुकारामांची कृपा असेल तर निश्चितच अशा संत, महात्म्यांचा सहवास आपणाला लाभेल. आपली सात्वीक भावना व तळमळ आपणाला अशा संतांपर्यंत नेऊन पोहचविल. जय जय राम कृष्ण हरी।

**– ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजारोहण



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली.

यावेळी अपर विभागीय आयुक्त प्रताप काळे, अपर विभागीय आयुक्त खुशालसिंह परदेशी, अपर विभागीय आयुक्त रिता मेत्रेवार, सह आयुक्त मंजुषा मिसकर, सह आयुक्त सर्जेराव सोनवणे, सहआयुक्त ज्ञानोबा मोकाटे, सहआयुक्त देविदास टेकाळे यांच्यासह विभागीय आयुक्त कार्यालयातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना म राठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

# शासकीय योजनांचा जागर: श्रीगणरायाच्या चरणी 'लोकसंवाद'ची ओवाळणी

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – गणराय ही खऱ्या अर्थाने लोकदेवता. गणरायाच्या आगमनाच्या निमित्त निर्माण झालेल्या चैतन्यमयी वातावरणात शासनाच्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याची संधी साधून शासकीय योजनांचा जागर करुन लोकसंवादाची ओवाळणी गणरायाच्या चरणी अर्पण करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने राज्यात 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. बुधवार दि. १६ ते २४ सप्टेंबर या कालावधीत हा उपक्रम राबविण्यात येणार असून, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही जिल्हा प्रशासनाच्या वतीने या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

'लोकसंवाद-२०२६'च्या माध्यमातून शासनाच्या विविध विभागांच्या योजना, त्यांचे लाभ, पात्रतेचे निकष तसेच नागरिकांसाठी उपयुक्त माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, सहकार, पणन, सार्वजनिक आरोग्य, कौशल्य विकास, क्रीडा व युवक कल्याण आदी विभागांच्या योजनांचा यात समावेश असेल. कृषी क्षेत्रातील शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, शेततळे, कृषी औजारांसाठी अनुदान तसेच महिला बचत गट आणि महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात येईल. विद्यार्थी व युवकांसाठी उच्च शिक्षण, शिष्यवृत्ती, विविध शैक्षणिक योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम तसेच स्वयंरोजगार व कर्ज योजनांची माहितीही या उपक्रमातून देण्यात येणार आहे. सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. सहभाग व सहकार्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त विभागीय माहिती कार्यालयात ध्वजारोहण



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त विभागीय माहिती कार्यालयाच्या प्रांगणात माहिती उपसंचालक प्रवीण टाके यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली.

याप्रसंगी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांच्यासह विभागीय माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय व माहिती केंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील हुतात्मे व स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले. माहिती उपसंचालक प्रवीण टाके यांनी उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात ध्वजारोहण



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या प्रांगणात न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी बँड पथकाने राष्ट्रगीताची धून वाजविली. त्यानंतर राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली.

यावेळी उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठातील न्यायमूर्ती संदीपकुमार सी. मोरे, किशोर सी. संत, आर. एम. जोशी, जितेंद्र शांतिलाल जैन, मंजुषा अ. देशपांडे, सचिन एस. देशमुख, अजित बी. कडेठाणकर, सिद्धेश्वर एस. ठोंबरे, वैशाली पाटील-जाधव, अबासाहेब धर्माजी शिंदे तसेच एस. जी. चपळगावकर उपस्थित होते.

तसेच खंडपीठातील सरकारी वकील अमरजितसिंग गिरासे, प्रबंधक (प्रशासन) उमाकांत सी. देशमुख, प्रबंधक (न्यायिक) राजेश सासणे यांच्यासह न्यायालयातील अधिकारी-कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी उपस्थितांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील हुतात्मे व स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले.

# छत्रपती संभाजीनगर विभागात दि.२९ रोजी पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – राज्यातील युवकांना रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्य विकास आणि उद्योजकतेच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने ङ्गपंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार म हाकुंभङ्घ या राज्यव्यापी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत राज्यभर एकाच दिवशी ८०० रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात येणार असून छत्रपती संभाजीनगर विभागातील ८ जिल्ह्यांमध्ये ११४ ठिकाणी रोजगार महाकुंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार महाकुंभात दहावी व बारावी उत्तीर्ण उमेदवार, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवीधर व पदव्युत्तर उमेदवार, डिप्लोमा व अभियांत्रिकी पदवीधारक, अल्पमुदतीचे कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार, आयटीआय उत्तीर्ण तसेच अंतिम वर्षातील प्रशिक्षणार्थी आणि रोजगाराच्या शोधात असलेल्या पात्र युवक-युवतींना सहभागी होता येणार असून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या रोजगार महाकुंभाम ध्ये आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराची संधी उपलब्ध होणार असून मुलाखतीपूर्वी सॉफ्ट स्कील्सचे प्रशिक्षण देखील होणार आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर विभागातील अधिकाधिक युवक-युवतींनी या संधीचा लाभ घ्यावा व नोंदणी करिता र्ही्िं://िक्षसरी.ारहीुरूरा.र्सी. ळप/िक्षसरी-ारहरज्ञीालह या वेबसाईट द्वारे संपर्क साधावा, असे आवाहन श्रीम. विद्या शितोळे, उपआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, छत्रपती संभाजीनगर येथे ध्वजारोहण व अभिवादन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

मा. श्री. कमलाकर हट्टेकर, प्राचार्य, भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, छत्रपती संभाजीनगर व मा. श्री. किशोर जाधव, उपसंचालक, भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर हे प्रमुख उपस्थित होते. दोन्ही मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले व स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करण्यात आले. या कार्यक्रमास प्रबोधिनीतील सर्व अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. पोलीस वाद्यवृंदाच्या तालावर राष्ट्रध्वजास म नवंदना देण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संगिता राठोड, उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार) संगीता सानप, उपजिल्हाधिकारी (रोहोयो) रुपेश शिंगारे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, अपर तहसिलदार उमेश पाटील, तहसिलदार पल्लवी लिगदे, रुपा चित्रक यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी -कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.यांनी उपस्थित सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना भेटून शुभेच्छा दिल्या.

# देश-विदेशातील घरगुती व सार्वजनिक गणपतींची माहिती एकाच मंचावर; तालुका व जिल्हास्तरावर पुरस्कार

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – आपल्या घरचा गणपती जगभरातल्या भक्तांपर्यंत पोहोचवायचाय? आपल्या घरचा गणपती, त्याची माहिती, आपल्या परिसरातील गणपतीची माहिती, हस्तकला, लोककला, वैशिष्ट्यपूर्ण परंपरा, प्रसादाचे पदार्थ अशा विविध माहितीचे संकलन bappa.org वर करण्यात येणार आहे. चला, लागा तयारीला बनवा व्हिडीओ. काढा फोटो आणि करा अपलोड...आणि हो यातून उत्कृष्ट गणपतीला, मंडळांना पारितोषिकेही देण्यात येणार आहेत.

महाराष्ट्राच्या वैभवशाली सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक असलेल्या गणेशोत्सवाला राज्य शासनाने 'राज्य महोत्सव' म्हणून मान्यता दिली आहे. गणेशोत्सवाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देण्यासह युनेस्कोचा वारसा दर्जा व अन्य जागतिक मानांकने प्राप्त करून देण्यासाठी राज्य शासनाने व्यापक मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**डिजीटल मंच उपलब्धता**

त्याच उपक्रमाचा भाग म्हणून गणेशोत्सवाची व्याप्ती जागतिक स्तरावर पोहोचविण्याच्या दृष्टीने http://bappa.org/ डिजिटल मंच उपलब्ध करून देण्यात आला आहे. या डिजिटल मंचावर देश-विदेशातील घरगुती तसेच सार्वजनिक गणपतींची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे विविध ठिकाणी साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाची माहिती व्यापक स्तरावर पोहोचण्यास मदत होणार आहे.

**काय माहिती देऊ शकता?**

आपण या डीजीटल प्लॅटफॉर्मवर आपल्या भागातील, आपल्या घरच्या, परिसरातील वैशिष्ट्यपूर्ण गणेशोत्सव, घरगुती गणपती, सार्वजनिक परंपरा, कलाकार, कारागिर, हस्तकला, लोककला, सांस्कृतिक उपक्रम, लोकपरंपरा इ. विषयीची माहिती, फोटो, व्हिडिओ, मुलाखती इ. अपलोड करु शकता. त्यासाठी आपण दिलेल्या लिंकवर जाऊन ॲप डाऊनलोड करु शकता.

**उत्कृष्ट गणेश मंडळांना पुरस्कार**

सामाजिक उपक्रम, पर्यावरणपूरकता, स्वच्छता आणि सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळांना तालुका व जिल्हास्तरावर पुरस्कार देण्यात येणार आहेत. तालुकास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या गणेश मंडळास २५ हजार रुपये पुरस्कार देण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकास ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ४० हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास ३० हजार रुपये पुरस्कार देण्यात येणार आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन**

जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी, गणेशभक्तांनी या पोर्टलवर आपल्या भागातील, घरातील गणपती व त्याच्याशी निगडीत परंपरा, कला यांची माहिती अपलोड करावी,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

# मुक्तिसंग्राम दिनानिमित्त ज्ञान संदीप विद्यालयात ध्वजारोहण हुतात्म्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – मिसरवाडी येथील ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित ज्ञान संदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात हैदराबाद-मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या सचिव सौ. संगीता खिल्लारे, किरणकुमार सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अभिजित सोनवणे होते. मान्यवरांनी मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक व हुतात्म्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी मुक्तिसंग्रामाचा इतिहास आणि स्वातंत्र्यवीरांच्या कार्यावर भाषणे केली. आलीना अजीज खान, इरफान रहीम शहा, आनम सादिक शेख, आलिया अजित खान, सायमा शेखनूर शेख, आदर्श कैलास रगडे, माजिया रहीम शहा, मुस्कान फिरोज पठाण आणि आदित्य संदीप बनकर यांनी सहभाग घेतला.

प्रा. प्रकाश सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना हैदराबाद-मराठवाडा मुक्तिसंग्रामाची पार्श्वभूमी व स्वातंत्र्यलढ्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतम मकासरे यांनी केले, तर किरणकुमार सोनवणे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वैशाली बोरुडे, हर्षाला खिल्लारे, तायेरा पठाण, आनंद सातदिवे, अजयकुमार खिल्लारे, विजय आघाव, नय्युम शेख आणि स्वामी जाधव यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने खाऊचे वाटप करण्यात आले.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अभिजात मराठी भाषा सप्ताहचे आयोजन

पुणे दि. १७ ( विजय न्यायाधीश यांजकडून) – महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभागाच्या निर्देशानुसार, ३ ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत अभिजात मराठी भाषा दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत म हापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीस उप आयुक्त पंकज पाटील, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडीचे प्राचार्य शशिकांत पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, ग्रंथालय प्रमुख प्रतिभा मुनावत, ग्रंथपाल वर्षा जाधव, वैशाली थोरात यांच्यासह मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कार्यरत संस्थांचे प्रतिनिधी, साहित्यिक, अभ्यासक व कलाकार उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी अभिजात मराठी भाषा सप्ताह व अभिजात मराठी भाषा दिवसाच्या आयोजनाबाबत विविध सूचना मांडल्या.



त्यामध्ये शहरात अनेक साहित्यिक वास्तव्यास असून त्यांची स्वलिखित पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. या स्थानिक साहित्यिकांच्या साहित्यकृतींना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या पुस्तकांचा महापालिकेच्या ग्रंथालयांमध्ये समावेश करण्यास तसेच विविध प्रसंगी महापालिकेच्या वतीने भेट स्वरूपात देण्यासाठी प्राधान्याने विचार करण्यात यावा, अशी सूचना उपस्थितांनी मांडली. स्थानिक कलाकारांनाही अशा उपक्रमांम धून प्रोत्साहन मिळत असल्याने, महापालिकेच्या विविध कार्यक्रमांमध्ये त्यांना प्राधान्याने सहभागी करून घ्यावे. तसेच, मराठी भाषा संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या विविध संस्था आणि व्यक्तींना महापालिकेच्या मराठी भाषा संवर्धनाशी संबंधित उपक्रमांमध्ये सहभागी करून घेऊन त्यांच्या अनुभव व योगदानाचा उपयोग करून घ्यावा, अशी सूचनाही यावेळी मांडण्यात आली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा :

# मराठवाड्यातील दुष्काळमुक्तीसाठी कृष्णाखोरे, कोकणातील पाणी आणणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- मराठवाड्याचा आधी स्वातंत्र्यासाठी संघर्ष झाला आता दुष्काळाशी संघर्ष सुरु आहे. आताही पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत आहे. या परिस्थितीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. ही परिस्थिती बदलवण्यासाठी कोकणातील आणि कृष्णाखोऱ्यातील वाहून जाणारे पाणी आपण मराठवाड्यात आणून मराठवाडा दुष्काळमुक्त करु,असा शब्द आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिला.







मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त आज मुख्यमंत्री फडणवीस छत्रपती संभाजीनगर येथे आयोजीत मुख्य शासकीय सोहळ्यास उपस्थित होते. श्री. फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण, मानवंदना, शहीदस्मारकास अभिवादन करण्यात आले. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आज मोठ्या उत्साहात साजरा झाला.

सिद्धार्थ उद्यान येथे आयोजीत या सोहळ्यास राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, महापौर समीर राजूरकर, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे, खा.संदिपान भुमरे, खा. डॉ. कल्याण काळे, विधानपरिषद सदस्य आ.सतिष चव्हाण, आ. अंबादास दानवे, आ. सुहास शिरसाट, विधानसभा सदस्य आ. रमेश बोरनारे, आ. प्रदीप जयस्वाल, आ. प्रशांत बंब, आ. विलास भुमरे, आ. अनुराधा चव्हाण, आ. नारायण कुचे, विभागीय आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम., छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, माजी खासदार चंद्रकांत खैरे, इम्तियाज जलील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, मुक्तिसंग्राम सैनिक, त्यांचे कुटूंबिय, शासकीय अधिकारी- कर्मचारी, पदाधिकारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी शहीद स्मारकास मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनीही पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले.त्यानंतर बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. तसेच राष्ट्र्ध्वजारोहण करुन राष्ट्र्ध्वजास मानवंदना देण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित केले. आपल्या भाषणाच्या प्रारंभी त्यांण छत्रपती शिवराय, राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना अर्पित केली. ते म्हणाले की, अनेकांच्या बलिदानामुळेच खऱ्या अर्थानं मराठवाडा मुक्त झाला आहे. त्यावेळी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल, ह्यांनी एक प्रचंड मोठी लढाई उभारली त्यातून आपला मराठवाडा मुक्त झाला. त्यावेळी अत्याचाराची परिसिमा झाली होती.अशा प्रकारच्या अवस्थेतून या मराठवाड्याला बाहेर काढण्याचं काम हे आपल्या स्वातंत्र्य संग्राम सेनानींनी केलं त्यांच्याप्रती आपली कृतज्ञता श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली. फडणवीस म्हणाले की, मराठवाडा सातत्याने संघर्ष करतोय. विकासाचा संघर्ष गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. दुष्काळाचं संकट हे सातत्याने घोंगावताना दिसतं. यंदाचे वर्ष देखील दुष्काळाचं वर्ष आहे. पावसाचा मोठा खंड पडला आणि मोठ्या प्रमाणात शेतीचं, पिकांचं नुकसान झालं. आमचा शेतकरी चिंतेत आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं राहील, शेतकऱ्यांना सगळ्या प्रकारची मदत आपण देऊ. पंचनाम्यांची प्रक्रिया ५ ऑक्टोबर नंतर पूर्ण करुन आम्ही शेतकऱ्यांना मदत करु. पिण्याचे पाणी, चारा अशी सगळी व्यवस्था आणि नियोजन केलं आहे.

फडणवीस यांनी पुढे सांगितले की, आपल्या सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना सुरू केली. या योजनेचा सर्वाधिक लाभ मराठवाड्यातील शेतकऱ्यांना दिलाय.आतापर्यंत १५ लाखांच्या वर शेतकरी कर्जमुक्त झाले आहेत. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहेच शिवाय आता जवळपास ४८ हजार कोटी रुपयांची, जुनी वीज बिल रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे,असेही त्यांनी सांगितले. मराठवाड्याच्या दुष्काळीस्थितीबाबत ते म्हणाले की, मराठवाड्याच्या या पिढीने दुष्काळ पाहिला; पण पुढच्या पिढीला आपल्याला दुष्काळ पाहू द्यायचा नाही हा संकल्प आम्ही केला आहे. आणि त्या दृष्टीने अतिशय वेगाने वाटचाल सुरु आहे. कृष्णा खोऱ्यातलं पाणी भीमा खोऱ्यातून अतिरिक्त ३० टीएमसी पाणी मराठवाड्यामध्ये आणायचं काम आता सुरू करत आहोत. यामुळे धाराशिव, बीड आणि लातूरच्या भागापर्यंत पाणी आणता येईल.तसेच गोदावरीच्या खोऱ्यामध्ये उल्हास खोऱ्यातून, कोकणातून पाणी उचलून आणि नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून आणण्याचा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यामध्ये पोहोचले आहे. अंदाज असा आहे की, जवळपास ७० टीएमसी पाणी उल्हास खोऱ्यातून हे गोदावरीच्या खोऱ्यात आपल्याला आणता येईल आणि आपला मराठवाडा कायमचा दुष्काळमुक्त होईल. टप्प्याटप्प्यानं; सात वर्षात हे काम पुर्ण होईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शहरातील पाणीपुरवठा योजनेबाबत श्री. फडणवीस म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरच्या पाणीपुरवठा योजनेचं काम हे आता अंतिम टप्प्यामध्ये पोहोचलेलं आहे. निधीची कमतरता पडू दिली नाही. वेगाने काम चाललेलं आहे. अडचणी आपण दूर करतो आहोत. लवकरच छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रत्येक घरी रोज पिण्याचं पाणी येईल. त्याकडे आपली वाटचाल ही सुरू झाली आहे,असेही त्यांनी यावेळी सांगितले.

फडणवीस म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर मध्ये पश्चिम उन्नत द्रुतगती मार्ग आणि समृद्धी महामार्गामुळे शेंद्रा-बिडकीनसारख्या औद्योगिक वसाहती, डीएमआयसीसारखं क्लस्टर आता देशातलं प्रमुख क्लस्टर झालंय. या ठिकाणी टोयोटा, जेएसडब्ल्यू, एथर या सारख्या कंपन्यांमुळे पुढच्या काळात देशामध्ये सर्वाधिक इलेक्ट्रिक व्हेइकल्स मॅन्युफॅक्चरिंग करणारं क्लस्टर हे छत्रपती संभाजीनगरचं क्लस्टर असणार आहे आणि एक वेगळा सन्मान मिळेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उद्योग विस्ताराबाबत श्री. फडणवीस म्हणाले की, मोठ्या प्रमाणात गुंतवणूक या ठिकाणी येतेय आणि या गुंतवणुकीला अनुरूप आता आपण इन्फ्रास्ट्रक्चरदेखील तयार करतो आहोत. अजून ८,००० एकर जागा त्या ठिकाणी अधिग्रहित करून आपली औद्योगिक वसाहत आपण मोठी करत आहोत. या संपूर्ण गुंतवणुकीमुळे आपल्याकडे रोजगाराची निर्मिती होतेय आणि या रोजगारातून समृद्धीकडे जाण्याचा प्रयत्न मराठवाड्यात होत आहे,असे त्यांनी सांगितले. उद्योगाच्या परिसंस्था विकासासाठी सुरु असलेल्या उपाययोजनांबाबत ते म्हणाले की, जालना ड्रायपोर्टचं काम आता सुरू झालंय. आपल्याकडे तयार होणाऱ्या इलेक्ट्रिक व्हेइकल्सच्या आवश्यक आयात निर्यातीची सुविधा या ड्रायपोर्टवरुन करण्यात आली आहे. तसेच संरक्षण उत्पादनाच्या क्षेत्रातही आपल्याला चांगला वाव आहे. त्यासाठी आपण शेंद्रा-बिडकीन आणि बिडकीन-ढोरेगाव हे दोन रस्ते सहा पदरी करतोय. त्याकरता साडेतीन हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. शहरातला सगळ्यात लांब उन्नत रस्ता आपण तयार करतो त्यामुळे कुठलाही ट्रॅफिक जॅम पुढच्या काळामध्ये होणार नाही,असेही त्यांनी सांगितले. आरोग्य सुविधांच्या विकासाबाबत श्री. फडणवीस यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे ७१० कोटी रुपयांच्या नवीन इमारतीची उभारणी, धाराशिवमध्ये राज्यातल्या एक ५०० खाटांचे अद्यावत रुग्णालय, मेडिकल कॉलेज असेल, किंवा परळीमध्ये ५६५ कोटी रुपये खर्चून पशुवैद्यकीय महाविद्यालय अशा अनेक सुविधांच्या विकासाचे काम आपण सुरु केले आहे,असे ते म्हणाले.

फडणवीस म्हणाले की, मराठवाडा हा आकांक्षी प्रदेश आहे. अनेक अडचणींचा सामना करणारा प्रदेश आहे.सगळ्यांना सोबत घेऊन मराठवाड्याला विकासाच्या वाटेवर आणण्याचे आणि परिवर्तित करण्याचे कार्य आपण सुरू केले आहे. समाजातल्या सर्व घटकांच्या पाठीशी उभं राहून त्यांना शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा देऊन त्यांच्या जीवनामध्ये परिवर्तनआणण्याचा प्रयत्न सुरु आहे,असे त्यांनी आश्वस्त केले. आपल्या संबोधनानंतर श्री. फडणवीस यांनी मुक्तिसंग्राम सैनिक, त्यांचे कुटुंबिय यांच्या भेटी घेतल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण लोहाडे आणि श्रीमती प्रवीणा कन्नडकर यांनी केले.

# मराठा आरक्षण शासनादेश दुरुस्ती करा व ओबीसी सारख्या सर्व सवलती द्या-मराठा क्रांती मोर्चा मुंबई आता पुढे सरसावली

## ज्यांचे कडे पुरावा ते कुणबी पण उर्वरित मराठ्यांचे काय?

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- मराठा समाजाचे सर्व प्रश्न सरकारने सोडवावेत यात प्रामुख्याने आरक्षणाचा प्रश्न ऐरणी वर असुन ज्यांचे कडे पुरावे असतील, ज्यांच्या वंशावळी जुळतील त्यांची जात प्रमाणपत्रे आणि व्हॅलिडिटी द्यावी व न्याय द्यावा नव्हे ती प्रमाणपत्र ज्यांचे कडे पुरावा आणि जुळणारी वंशावळ आहे त्यांना मिळणारच आहे परंतु परंतु ज्यांचे कडे काही एक पुरावा नाही त्या मराठा बांधवांचे काय? असा घणाघात मराठा समाजाच्या वतीने उच्च व सर्वोच्च न्यायालयातील १० पेक्षा जास्त असलेल्या हस्तक्षेप याचिका मध्ये मराठा समाजाच्या वतीने असलेले मुख्य हस्तक्षेप याचीकाकर्ते जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केलेला असुन १० टक्के आरक्षण शासनाने टिकवावे आणि युवा वर्गाच्या भविष्यातील उन्नती साठी हेच योग्य ठरणारे असुन या त्यांच्या मागणीस आमचा सक्रिय पाठिंबा असल्याचे मराठा क्रांती मोर्चा मुंबई यांनी जाहीर केलेला आहे.त्या अनुसार मुंबई मराठा क्रांती मोर्चाने एक पत्रक देखील १७ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केले आहे.

मराठा समाजाच्या वतीने न्यायालयात असलेले मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे मते राज्य शासनाचे उच्च न्यायालया तील प्रकरणा कडे एकाग्रता ठेऊन कार्य सुरु नसुन सर्वोच्च न्यायालयातील क्यूरेटिव्ह पिटीशन मध्ये सुधारीत कायदेशीर व घटनात्मक तरतुद असलेल्या तरतुदीचे अर्ज दिला नाही तर तिथे सुद्धा यश मिळणार नाही या बाबत आमचा त्यांना पाठिंबा असुन अशीच बाब मुंबईउच्च न्यायालयात असुन सर्वोच्च न्यायालयाने मनाई केलेल्या मागण्या व निवेदन राज्य शासनाचे वतीने सतत केली जात असुन हे प्रकरण सुद्धा हातातून गेल्या सारखी स्थिती असुन ते स्वतः या साठी शासना कडे सातत्याने पाठपुरावा करीत असुन जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी सद्य स्थितीवर आणि माधुरी पाटील विरुद्ध आतरिक्त आयुक्त या सर्वोच्च न्यायलयातील प्रकारणांतील निर्देश पालन करणे गरजेचे कसे आहे हे सुद्धा या पी पी टी मध्ये नमुद असुन अंत्यन्त अभ्यासु असे सुधारीत कायदेशीर व घटनात्मक तरतुदीच्या विविध अशा १०० पेक्षा जास्त घटनापीठाचे निर्णय पृष्ठ निहाय असलेले ’ ङपॉवर पॉईंट प्रेझेंटेशन ’ङ सादरीकरण मुख्यमंत्र्यांनी- उपमुख्यमंत्री यांनी मंत्री मंडळ उपसमितीच्या बैठकीत स्वतः पहावे अशी त्यांची मागणी असुनओबीसी सारख्या सर्व सवलती देतांना बालवाडी ते पदव्युत्तर प्रवेश, शिक्षण आणि नोकरीत वयाची अट ओबीसी सारखी ठेवण्याची सवलती मराठा समाजाला देतांना, राजकीय आरक्षण वगळता द्याव्यात आणि तशी मागणी मराठा समाजाच्या वतीने असलेले मुख्य हस्तक्षेप याचीकाकर्ते जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी शासना कडे मनःभेद कायम स्व:रूपी संपविण्यासाठी त्यांच्या छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या अन्नत्याग उपोषण आंदोलनात त्यांनी केलेली मागणीच न्याय देणार असुन मसुद्या प्रमाणे दुरुस्ती चा शासनादेश जारी करावा जेणे करून ओबीसी- मराठा हा निर्माण झालेला वाद संपुष्टात येईल आणि

’ फुले शाहू आंबेडकर ’ यांचा महाराष्ट्र हे चित्र परत देशभरात जाईल,राज्य शासनाचे मराठा समाजाच्या मागण्याकडे लक्ष वेधण्या साठी सदरचे अन्नत्याग उपोषण आंदोलन होते न की कोणाच्या विरुद्ध व्यक्त होणारे उपोषण होते.

स्व.आण्णासाहेब पाटील महामंडळास व्याज परतावा आणि पुढील कामासाठी १० हजार कोटी,सारथी च्या विद्यार्थी उपक्रमासाठी, परदेशी जाऊन उच्च शिक्षणासाठी अधिकच्या ३०० संस्थांनाच्या निवड करून पात्रता साठी ५५ङ गुण एवढी मर्यादा ठेऊन ५ हजार कोटींचा निधी द्यावा, आंदोलनातील सर्व गुन्हे तातडीने परत घ्यावेत,मराठा समाजातील तरुणांच्या प्रलंबित नियुक्त्या व प्रशासनिक आदेश तात्काळ देऊन मार्ग मोकळा करतांना न्याय देण्याची भूमिका ठेवावी अशी व इतर प्रलंबित मागण्याची अपूर्ण असलेली पूर्तता करण्याची मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केलेली असुन त्या मागणीस मराठा क्रांती मोर्चा मुंबईचा पाठिंबा असुन मुख्यमंत्री यांचे समक्ष व मराठा उपसमिती समोर सदरचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन पहिल्या जाईल असे आश्वासन जेष्ठ मंत्री गिरीश महाजन यांनी दिलेले असुन या बाबत लवकरच ही बैठक आयोजीत करावी अशी मागणी मराठा क्रांती मोर्चा मुंबईचे रामचंद्र शेडगे यांचे सह अनिल सुर्वे,सदाशिव बानुगडेदाजी, संतोष शेजवळ,मारुती देसाई, राकेश वासुदेव,पांडुरंग रोडे, सुभाष देसाई,दिनेश पवार, शैलेश शिंदे सुशील निकम, विवेक शिंदे आदींनी केली आहे.

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची रक्कम बँकेत जमा झालीच नाही पण अन्य सेविंग खाते एन पी ए मध्ये लॉक

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (अशोक वाघ)- राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची रक्कम बँकेत जमा केली नसल्याने शेतकऱ्यांची अन्य सेविग खाते बँकांनी एन पी ए मध्ये टाकले आहे. ऐन सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत असल्याने शेतकरी वर्गातून सरकार विरुद्ध संतापाची भावना निर्माण झाली आहे

राज्य सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी जुलैमध्ये केली जाईल अशी घोषणा केली होती प्रत्यक्षात मात्र त्या घोषणेप्रमाणे सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची हालचाल सुरू केली नव्हतीच किंबहुना जुलै नंतर राज्य सरकारने शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठी हालचालीला वेग दिल्यानंतर थकीत असणाऱ्या शेतकऱ्यांना मेसेज आल्यानंतर ही केवायसी करण्याचे प्रमाण सोडण्यात आले. शेतकऱ्यांनी ई केवायसी करून जवळपास महिना दीड महिन्याचा कालावधी उलटला गेला असला तरी शेतकऱ्यांच्या थकीत कर्जाची रक्कम अद्यापही शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झालेली नाही त्यामुळे थकबाकीदार असलेल्या शेतकऱ्यांचे त्याच बँकेत असलेले अन्यसेविंग खाते सदर बँकांनी एनपीएमध्ये टाकल्याने बंद झाले पर्यायी शेतकऱ्यांना खर्चासाठी ठेवलेली तुटपुंजी रक्कम सेविंग खात्यावरून काढता येत नाही आणि तशातच आता ऐन सणासुदीचे दिवस असल्याने शेतकऱ्यांची मोठी फटमार होत आहे.

थकबाकीदार असलेले शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र असताना अशा शेतकऱ्यांना बँका कुठलाही त्रास देणार नाहीत किंबहुना अशा शेतकऱ्यांची बँकामार्फत कोणतीही फरफट होणार नाही असा खुलासा खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारंवार करूनही शेतकरी मात्र आज वेठीस धरले जात आहेत याला बँका जबाबदार की शासन हे सुचायला मार्ग नाही. राज्यात सध्या पाऊस नसल्याने खरिपाच्या पिकाची पूर्ण वाट लागली आहे त्यातून शेतकरी अत्यंत मोठ्या संकटात असताना कर्जमाफीच्या पडद्याआडून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात वेठीस धरल्या जात असल्याची भावना सर्वसामान्य शेतकरी वर्तऊ लागले आहेत शासनाने वा जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या या होणाऱ्या पिळवणुकीकडे तातडीने लक्ष देऊन संबंधित बँकांना संदेश द्यावा असा सूर एकंदरीत शेतकरी वर्ग बोलून दाखवत आहेत.

## पं.नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमेला ७६ दिवे उजळवून वाढदिवस उत्साहात साजरा

पुणे दि.१७ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपला देश अधिकाधिक बलवान होत चालला आहे. पुढील काळातही त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या देशाची प्रगती वाढत जाणार असल्याचे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिका विधी समितीच्या सदस्या तसेच नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्यावतीने आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. गुरुवार दि. १७ रोजी सकाळी फाउंडेशनच्या प्रांगणात उपस्थित नागरिकांच्या उत्साहपूर्ण प्रतिसादात झालेल्या या कार्यक्रमात प्रारंभी परिसरातील सफाई कामगारांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. सामाजिक समरसतेच्या बांधिलकीतून सेवा संकल्प अभियानांतर्गत हा उपक्रम घेण्यात आला.

श्री गणेशाच्या आरतीनंतर ७६ दिवे उजळवून नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सागर बिरारी यांनी १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या दरम्यान आयोजित सेवा संकल्प अभियानाची माहिती दिली. उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्षा डॉ. रश्मी मोरे तसेच ज्येष्ठ नागरिक प्रा. प्रेमलाल लांजेवार यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे यांनी केले. श्री गणेशाच्या प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठान गणेशोत्सव मंडळाला भेट

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि. १६)रात्री सिडको एन ५ भागातील अजिंक्य देवगिरी गणेश उत्सव प्रतिष्ठान या मंडळास भेट देऊन आरती केली. तसेच उपस्थित भाविकांशी संवाद साधला. मंडळाचे अध्यक्ष विनोद पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. आ. नारायण कुचे, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, राजेंद्र साबळे-पाटील,माजी मंत्री डॉ. भागवत कराड, किशोर शितोळे आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. श्री. फडणवीस यांनी उपस्थित गणेश भक्तांना



शुभेच्छा देऊन त्यांच्या आरोग्य व संपन्नतेची कामना केली.

## वैजापुरात ‘नमो उद्यान’लोकार्पण सोहळा उत्साहात

वैजापूर दि.१७ (प्रतिनिधी)- मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व भारताचे मानबिंदू,विकासाची दूरदृष्टी असलेले कर्तव्य दक्ष पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधत येथील नगर परिषदेच्या वतीने लक्ष्मीनारायण नगर येथे जवळपास पांच एकरवर उभारण्यात आलेल्या’नमो उद्यान’चा लोकार्पण सोहळा गुरुवार(ता,१७)रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या उद्यानात नमो वाचनालयाचा लोकार्पण सोहळा ही सम्पन्न झाला.या परिसरातील नागरिकांना सर्व सोयी युक्त हे उद्यान आहे.वाचनसाठी वाचनालय,मुलांना खेळण्यासाठी विविध खेळांचे व व्यायाम साहित्य, नागरिक महिला व पुरुषांना फिरण्यासाठी ट्रॅक,मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण,मोठ्या प्रमाणात आसन व्यवस्था,धार्मिक स्थळ महादेव व लक्ष्मी- नारायण मंदिर, मोठे रस्ते,घनदाट झाडी व ,सुलभ शौचालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अशा सर्व सोयींनी युक्त असे हे’नमो उद्यान’नागरिकांना खुले करण्यात आले.नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी,उपनगराध्यक्ष शेख रियाज,मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत यांच्या उपस्थितीत जेष्ठतम नागरिक शोभचंद संचेती,श्री. राऊत बाबा,जेष्ठ पत्रकार घन:श्याम वाणी, बाबासाहेब गायकवाड, श्री.वारकर,भाऊसाहेब गलांडेश्रीमती वारकर ताई,श्रीमती जाधव ताई यांच्या हस्ते फित सोडून व श्रीफळ सोडून लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात सम्पन्न झाला.





या प्रसंगी नगराध्यक्ष डॉ-दिनेश परदेशी यांनी बोलतांना आवाहन केले की,हे उद्यान या वसाहती च्या नागरिकांचे आहे,याची निगा राखण्यासाठी सर्वांनी काळजी घ्यावी.माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी यांनी ही या उद्यानाची देखभाल करून जास्तीत जास्त उपयोग महिला,व मुलांनी घ्यावा.वसाहतीतील रहिवाशी श्री . वारकर,श्री,धामणे, यांनी ही नगरपालिकेला अद्यावत सोयीयुक्त उद्यान उपलब्ध करून दिल्या बद्धल धन्यवाद दिले,.जेष्ठतम नागरिक शोभचंद संचेती यांनी ही मनोगत व्यक्त केले.प्रास्तविक मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत यांनी केले.सूत्र संचलन व आभार जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी मानले.नगरसेवक दशरथ बनकर, दिनेश राजपूत यांनीही मनोगत व्यक्त केले.या प्रसंगी,कल्याण दांगोडे, मधुकर साळुंके, नगरसेवक विशाल संचेती,राजेश गायकवाड,उल्हास ठोंबरे,लिमेश वाणी,प्रशांत कंगले,प्रकाश चव्हाण,जयमाला वाघ, ,वैशाली पवार,नगरसेविका ज्योती जोशी, सुवर्णा ठोंबरे,संगीता राजपूत, जयश्री राजपूत, दीपा राजपूत, लता वाणी, कविता शिंदे,शेख बक्ष सुमैय्यां,विनोद राजपूत, तसेच युवराज चेळेकर,विशाल शिंदे,सागर ,डगळे, अॅड,संदीप डोंगरे, सचिन राऊत, प्रेम राजपूत,शैलेश पोंदे,भीमाशंकर साखरे,दादा साहेब फोफसे,डॉ.गणेश अग्रवाल,डॉ.बी.बी. शिंदे,श्री. गाढे ,जगन थोरात,नितीन धामणे,चंद्रकांत मोटे,सतीश वर्मा,श्याम राजपूत, संदीप निर्मळ ,उमाकांत ठोंबरे,यांच्या सह अनिता तांबे,ज्योती थोरात, उगले ताई, रिंढे ताई,जाधव ताई,वारकर ताई यांच्या सह विलास रमैय्या- शेवटी शंकर जोरे यांनी आभार मानले.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त मनपा मुख्यालयात ध्वजारोहण





छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मुख्यालयात आज सकाळी ७.३० वाजता महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी गलिच्छ शहर सुधार समितीचे सभापती जालिंदर शेंडगे, गटनेते हाजी शेरखान, आरोग्य समितीच्या सभापती डॉ. सुनीता सोळुंके, नगरसेविका कीर्ती शिंदे, सुरेखा सानप, नगरसेवक सचिन खैरे, वाजेद जागीरदार, काकासाहेब काकडे, कुणाल खरात, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना शुभेच्छा संदेश देताना महापौर समीर राजूरकर म्हणाले, ‘मराठवाड्याला निजामाच्या हुकूमशाहीतून मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला संघर्ष आणि हुतात्म्यांनी दिलेले बलिदान विसरता कामा नये. स्वातंत्र्यासाठी त्यांनी सोसलेली पीडा आणि केलेला त्याग हा मराठवाड्याच्या इतिहासातील प्रेरणादायी अध्याय आहे. हा इतिहास आणि त्यांचे योगदान पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.’ दरम्यान, प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.